



दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १३१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२४ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ठाकरे बंधूंचं ठरलं! आज युतीची अधिकृत घोषणा करणार !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्या युतीचा मुहूर्त अखेर निश्चित झाला आहे. उद्या दोन्ही पक्षांची युती जाहीर होणार असल्याची माहिती शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. उद्या सकाळी १२ वाजता युतीची घोषणा होणार आहे. संजय राऊत यांनी एक्सवर पोस्ट करुन यासंदर्भातील माहिती दिली आहे. राऊत यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांचा एक फोटो पोस्ट केला आहे. हा फोटो उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशी काढण्यात आलेला आहे.






मुंबईच्या वरळी येथील हॉटेल ब्लू सीममध्ये उद्या दुपारी १२ वाजता ठाकरे बंधूंकडून युतीची घोषणा होणार आहे. विशेष म्हणजे याच वरळीत उद्धव आणि राज तब्बल दोन दशकांनंतर सार्वजनिकरित्या एका मंचावर आले होते. ५ जुलै २०२५ रोजी वरळीतील एनएससीआय डोममध्ये विजयी म ेळाव्यात एकत्र आले होते. त्यावेळी महायुती सरकारनं प्राथमिक शाळेत हिंदी भाषा सक्तीचा जीआर काढला होता. त्या विरोधात दोन्ही भाऊ एकत्र आले. हिंदी सक्तीचा विषय बराच तापला. याचे तीव्र पडसाद उमटले. त्यानंतर सरकारनं जीआर मागे घेतले. तेव्हा ठाकरे बंधूंनी वरळीत विजयी मेळावा घेतला होता. त्याला आता ५ महिने उलटले आहेत.

उद्या पुन्हा एकदा वरळीत दोन बंधूंसाठी महत्त्वाचा दिवस असेल. शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्या युतीची घोषणा केली जाईल. वरळी ठाकरेंच्या शिवसेनेसाठी अनेक अर्थांनी महत्त्वाची आहे. राजकारणात निवडणुकीच्या आखाड्यापासून कायम दूर राहणाऱ्या ठाकरे कुटुंबानं वरळीतूनच निवडणुकीच्या आखाड्यात प्रवेश केला. आदित्य ठाकरे यांनी २०१९ मध्ये वरळीतून विधानसभा निवडणूक लढवली. २०२४ मध्येही ते याच वरळी मतदारसंघातून विजयी झाले. त्यामुळे ठाकरे कुटुंबासाठी वरळीचं महत्त्व मोठं आहे.

विशेष म्हणजे आदित्य ठाकरे निवडणूक रिंगणात उतरणार असल्यानं राज ठाकरेंनी यांनी २०१९ मध्ये म नसेकडून उमेदवार दिला नव्हता. त्याचा लाभ आदित्य यांना झाला. ते मोठ्या मताधिक्क्यानं निवडून आले. आता त्याच वरळीत शिवसेना उबाठा आणि मनसेच्या युतीची घोषणा होणार आहे. मुंबई म हापालिकेत एकूण २२७ प्रभाग आहेत. यापैकी १५० ते १६० जागा शिवसेना उबाठा लढू शकते. तर मनसेला ६० ते ७० जागा दिल्या जाऊ शकतात.

---

## किडनी रॅकेट प्रकरणातील मुख्य सुत्रधाराला अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** किडनी रॅकेट प्रकरणातील मुख्य सुत्रधाराला चंद्रपूर पोलिसांनी रविवारी रात्रीच्या सुमारास सोलापूर येथून अटक केली आहे. 'कृष्णा' असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. 'डॉ. कृष्णा' हे नाव धारण करून तो सोलापुरात वास्तव्यास होता. आरोपीला सोमवारी न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी मंगळवार, २३ डिसेंबर रोजी आयोजित पत्रपरिषदेत दिली.

नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील पीडित शेतकरी रोशन कुडे हे खाजगी सावकारांच्या कर्जामुळे प्रचंड मानसिक तणावात होते. कर्ज फेडण्यासाठी कोणताही मार्ग उरला नसल्याने त्यांनी समाज माध्यमाचा आधार घेतला. फेसबुकवर किडनी विक्री संदर्भात शोध घेत असताना त्यांची भेट 'डॉ. कृष्णा' नावाच्या 'प्रोफाईल'शी झाली. आरोपीने रोशन यांच्या हतबलतेचा फायदा घेत त्यांना किडनीच्या बदल्यात ८ लाख रुपये देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर विमानाचे तिकीट आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करून रोशन यांना कंबोडिया या देशात नेण्यात आले. कंबोडियातील एका खाजगी रुग्णालयात रोशन कुडे यांची किडनी काढण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर त्यांना ठरलेली रक्कम देण्यासाठी आरोपीने टाळाटाळ सुरू केली. केवळ नावापुरते काही पैसे देण्यात आले आणि त्यांना भारतात परत पाठवण्यात आले. भारतात परतल्यावर एका किडनीवर जगताना रोशन यांची प्रकृती खालावली आणि सावकारांचा त्रासही कमी झाला नाही. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी धाडस करून पोलिसांत तक्रार दिली. यामागे एक मोठे रॅकेट सक्रीय असून, या रॅकेटचे लक्ष्य कर्जबाजारी शेतकरी, बेरोजगार तरुण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोक असू शकतात. कृष्ण हा फ ेसबुक आणि टेलिग्राम ग्रुप्सचा वापर करून गरजूंचा शोध घ्यायचा. त्याने आतापर्यंत कुणाकुणाला कंबोडियाला पाठवले आहे आणि या व्यवहारात कोणत्या मोठ्या डॉक्टरांचा किंवा रुग्णालय साखळीचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिली. पत्रपरिषदेला अप्पर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे उपस्थित होते.

**आरोपीनेही विकली होती स्वत:ची किडनी!**

आरोपी कृष्णा याने २०१५ मध्ये एक छोटी कंपनी सुरू केली होती. या व्यवसायात तो अपयशी ठरल्याने कर्जात बुडाला होता. आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी कृष्णा याने कंबोडिया येथील रुग्णालयात आपली किडनी विकली होती. २०१८ पासून तो त्या रुग्णालयाच्या संपर्कात होता. आतापर्यंत १० ते १२ लोकांना किडनी काढण्यासाठी कंबोडिया येथे नेल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली.

---

## बीडमध्ये पतीने नातेवाईकाला संपवलं

**दि.२३, बीड :** बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव शिवारात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली होती. बीड स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या दोन दिवसांत या खुनाचा छडा लावून मुख्य आरोपीसह चार जणांना अटक केली आहे. १८ डिसेंबर २०२५ रोजी जवळगाव येथील गायरान शेतात स्वप्निल ऊर्फ चिंगू अशोक ओव्हाळ (३०, रा. चक्रे गल्ली, रेणापूर) याचा मृतदेह पालथ्या स्थितीत आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात स्वप्निलचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर बर्दापूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी मुख्य आरोपी गोरोबा मधूकर डावरे (४५, रा. जवळगाव, ता. अंबाजोगाई) याच्यासह त्याचे साथीदार संतोष लिंबाजी मांदळे (३४, रा. इंडियानगर, लातूर), किशोर गोरोबा सोनवणे (२९, रा. बसवेश्वर चौक, लातूर) आणि अमोल विनायक चव्हाण (२६, रा. एस. टी. क्वार्टर, लातूर) यांना २० डिसेंबर रोजी ताब्यात घेतले. मृत स्वप्निल हा मुख्य आरोपी गोरोबा याचा नातेवाईक होता. स्वप्निल हा सतत दारू पिऊन पत्नीला आणि गोरोबा यांना त्रास देत असे, तसेच त्याने वादात गोरोबाच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला होता. याच रागातून गोरोबाने त्याला रेणापूर येथून जवळगावला आणले आणि गळा आवळून त्याची हत्या केली.

---

## रासायनिक खतांच्या किमती पुन्हा वाढल्या ; शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले

### गोणीमागे २०० ते ३०० रुपये अधिक मोजावे लागणार...!



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पुन्हा एकदा बिघडले आहे. रासायनिक खतांच्या किंमतीत १५ टक्क्यांनी वाढ झालीय. रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतांच्या गोणीमागे २०० ते ३०० रुपयांपर्यंत वाढ झाल्याने शेतकरी चिंतेत असून आर्थिक कोंडीत सापडला आहे.

एकीकडे शेतीमालाला भाव मिळत नाहीय, त्यात खते व कीटकनाशकांच्या किमती दरवर्षी वाढत असल्याने शेतकरी मेटाकुटीस आले आहेत.आगामी हंगामाचे नियोजन करताना खर्च-उत्पन्नाचा ताळमेळ बसत नसल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली.

अलीकडच्या काळात उत्पादनवाढीसाठी रासायनिक खतांचा वापर अनिवार्य झाला आहे. मात्र, शासनाच्या दर धोरणामुळे खतांच्या किमती वर्षोनुवर्षे वाढत असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक भार वाढत चालला आहे.

अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे खरीप हंगाम ात मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीतून सावरण्यापूर्वीच रब्बी हंगामात खतांचे दर वाढल्यामुळे शेतकरी नव्या आर्थिक संकटात सापडला आहे. खतांच्या ५० किलोच्या पिशवीमागे साधारणपणे २०० ते ३०० रुपयांची जादा रक्कम मोजावी लागत असल्याने उत्पादन खर्च आवाक्याबाहेर गेला आहे.

| खतांचा प्रकार | जुने दर | नवे दर |
|---|---|---|
| १०.२६.२६ | जुने दर - १८५० | नवीन दर -२१०० |
| १९,१९.१९ | जुने दर -१७६० | नवीन दर -२००० |
| २४,२४,०० | जुने दर - १८०० | नवीन दर -१९०० |
| २०,२०,१३ | जुने दर - १३०० | नवीन दर -१५५० |
| १५,१५,१५ | जुने दर - १४७० | नवीन दर -१६५० |
| ब्ल्यू कॉपर | जुने दर - ३५० | नवीन दर -४०० |
| रोगर | जुने दर - ६०० | नवीन दर -७०० |
| एम ४५ | जुने दर -२०० | नवीन दर -२५० |

"गेल्या काही वर्षांपासून कोबी, टोमॅटो व कांद्यासह अन्य शेतमालाचे भाव सातत्याने घसरत आहे. त्यामुळे आता नेमके पिकवावं काय,हा यक्षप्रश्न आज शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे आणि रासायनिक खतांचे भाव दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे.

**-- योगेश पायमोडे**
**शेतकरी, टाकळी ढोकेश्वर**

"सध्या कांद्यासाठी एकरी चार बॅग रासायनिक खत लागत असून, खतांच्या किमतीमध्ये प्रतिगोणी २०० ते ३०० रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. एकीकडे शेतमालास भाव मि ळत नसताना खते व कीडनाशकांच्या किंमती वाढत असल्याने शेतकऱ्यांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

**-- पंकज जाधव,**
**माऊली कृ.से.केंद्र, टाकळी ढोकेश्वर**

---

## अंतिम मतदार याद्या अजूनही दोषांसहित प्रसिद्ध

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२३, नवी मुंबई :** दिनांक १५ डिसेंबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध झाल्या मात्र मतदार याद्या सदोषच आहेत. अजूनही मयत लोकांची नावे यादीत झळकतात, काही लोकांचे फोटो चुकीचे आहेत. यादी मधील नांवे क्रमवारीत नाहीत. वास्तविक मतदार यादी आडनावानुसार असती तर मात्र मतदाराचे यादीत नाव शोधणे सोपे झाले असते पण तसे केले नाही.

म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अजूनही प्रश्न आहेच. प्रभाग क्रमांक २२ च्या मतदार यादीच्या पुस्तकात २११७ पाने छापून आलेली आहेत. ज्यात सुमारे ९९६ पाने प्रशासकीय चुकीमुळे जास्त वापरली आहेत. सदर यादीत अश्या प्रकारे शेकडो पाने वाया घालवली आहेत.

सदर बाबतीत असे आढळते कि, छपाई करताना चुकीच्या सॉर्टींग फंक्शनने हे झालेले आहे. उदा. त्याच यादी मधील एका पानावर १४०:८ ची यादी छापली आहे पण नंतर १४०:९ तेथेच न छापता दुसऱ्या पानावर छापले आहे. त्यानंतर १०४:२ ची यादी मधेच आली त्यासाठी पुन्हा दुसरे पान वापरले व अशा उलट सुलट क्रमांमुळे विनाकारण पाने वाढलेली आहेत व त्याचा भुर्दंड इच्छुकांना पडला आहे. अशी चूक यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर कधीच झाली नव्हती.

चार चार प्रभागांच्या याद्या आहेत या नावाखाली प्रशासनाने हे जास्त पानांचे ओझे इच्छुकांच्या माथी मारले असून सुमारे १९०० ते २००० रुपये प्रत्येक यादी पुस्तकाम ागे वसूल केलेले आहेत. सदर यादी पुस्तक वागवणे देखील जड आहे. सदरची यातायात जुईनगरच्या सम ाजसेवक

श्रीधर मढवी यांनी उकरली असून प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षाम ुळे विनाकारण इच्छुकांना भुर्दंड पडलेला आहे. जर व्यवस्थित छपाई झाली असती तर ते पुस्तक अर्धेच दिसले असते. तरी प्रशासनाने सर्व यादी खरेदीदारांना प्रत्येकी २०००/- रुपये परत द्यायला पाहिजेत असे मत समाजसेवक श्रीधर मढवी यांनी दैनिक अक्षराजच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे.

## संपादकीय



## आर्थिक उदारीकरणाचे जनक

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरोमनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली.

पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

# बांधवांनो, अंधश्रद्धेला कायमची मुठमाती देऊया...

जगात सर्वात जास्त अंधश्रद्धाळू लोक भारतात आहेत. आपला भारत देश अंधश्रद्धाळू लोकांचा देश म्हणून जगभर ओळखला जातो. बुलढाण्याच्या सैलानी बाबाला आणि परभणीच्या तुरत पिराला भेट दिल्यावर आपल्याला कळेल की, आपल्या देशात अंधश्रद्धाळू लोक किती आहेत? त्यात अंधश्रद्धाळू महिलांचे प्रमाण किती आहे? तिथे किती सुशिक्षित लोक येतात व किती अशिक्षित लोक येतात? याचा अंदाज आपल्याला लागेल. पुरुषांपेक्षा महिला अधिक प्रमाणात देवदेव करतात, शकुन-अपशकुन पाळतात आणि दगड धोंड्यांना पूजतात. तसेच उपास तापास धरणे, कोणता तरी नवस बोलणे आणि नवस फेडण्यासाठी कंदुरी करणे, त्यासाठी जिवंत बोकडाचा बळी देणे, सोन्या चांदीचे दागिने देवाला अर्पण करणे, हे काम महिला कटाक्षाने करतात. म्हणतात ना, महिलांचा स्वभाव जरा भोळाच असतो, कदाचित ते खरेही असेल. म्हणूनच महिला कोणत्याही भोंदू बाबाला सहज बळी पडतात. भोंदू बाबा त्यांना फसवून त्यांचे आर्थिक शोषण तर करतोच परंतु त्यांचे लैंगिक शोषण करायला सुद्धा मागे पुढे पाहत नाही. दारावर भगवे वस्त्र परिधान करून आलेले भोंदू बाबा महिलांना गोड गोड बोलून त्यांच्याकडून निघेल तेवढा पैसा उकळतात. महिलांना करणी, भानामती, भूतबाधा आणि आसरा-मसोबा लागला म्हणून सांगतात. त्यांना कसलातरी अमुक तमुक क्रियाक्रम करायला लावतात. भोंदूबाबा जे सांगेल त्या गोष्टी महिला मन लावून ऐकतात, तसे आचरण करतात. शिकलेले लोक असोत किंवा अडाणी लोक असोत, ते बऱ्यापैकी अंधश्रद्धेच्या आहारी गेलेले दिसतात. खरे तर शिकलेल्या लोकांनी अंधश्रद्धेला मुठमाती द्यायला हवी, परंतु तसे न करता उलट शिकलेले लोक अडाणी लोकांपेक्षा अधिक अंधश्रद्धेच्या आहारी जातात. सध्या जर

आपण कोणत्या मंदिरात किंवा बुवा बाबाकडे गेलात तर आपल्याला असे दिसून येईल की, तिथे सर्वात जास्त सुशिक्षित लोकांचीच गर्दी अधिक प्रमाणात पाहायला मिळते. शिक्षण शिकूनही जर लोक अंधश्रद्धेला बळी पडत असतील तर शिक्षण व्यवस्था कुठेतरी भ्रष्ट झाली आहे, असेच म्हणावे लागेल. शाळेत विद्यार्थ्यांना विज्ञान विषय शिकवला जातो, तरीसुद्धा लोक अंधश्रद्धा का पाळतात? म्हणजे शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवण्यात कुठेतरी कमी पडत आहेत, असेच म्हणावे लागेल. शकुन-अपशकुन व आसरा-मसोबा लागला, मांजर आडवी गेली, कोणाची नजर लागली, म्हणून बहुतांश लोक बुवा बाबाकडे जातात, भोंदू बाबांनी जेवढ्या वाऱ्या सांगितल्या तेवढ्या वाऱ्या नित्यनेमाने करतात. आणि त्याला देवाच्या नावावर सोन्या चांदीचे अलंकार करून देतात. भोंदू बाबाला भरपूर पैसा देऊन शेवटी ते कंगाल होतात. शेवटी आजार काही कमी होत नाही, उलट आजार बळावत जातो, मग मात्र त्यांना दवाखाना आठवतो. शेवटी त्यांना दवाखान्याच्या पायऱ्या चढाव्या लागतात. भोंदू बाबाने आपल्याला फसवले असे त्यांच्या लक्षात येते. मग मात्र त्यांना पश्चाताप होतो. आणि त्यांच्या मनात भोंदू बाबाबद्दल तिरस्कार निर्माण होतो. आणि नंतर ते आयुष्यात चुकूनही भोंदू बाबाकडे जात नाहीत. त्यांच्या मनात असणारा भोंदू बाबा बद्दलचा विश्वास व आदर कमी होतो. परंतु महिला मात्र फार अंधश्रद्धाळू व भोंदू बाबाच्या भक्त असतात. त्या मरेपर्यंत अंधश्रद्धेला चिकटून राहतात. त्यांना कितीही विज्ञानाचे महत्त्व सांगा, करणी, भानामती, भूतबाधा, शकुन-अपशकुन, आसरा-मसोबा, हे निव्वळ थोतांड आहे. याला बळी न पडता विज्ञानाचा आधार घेऊन व विज्ञानवादी दृष्टीकोन ठेवून, समस्त महिलांनी व पुरुषांनी एकत्र येऊन अंधश्रद्धेला मुठमाती देण्याचा संकल्प करूया.



महिलांना देव नाही यावर विश्वास नसतो. महिला दगडात देव आहे, म्हणून दगडाची देखील पूजा करतात. सोमवार, शनिवार उपासतापास धरतात. म्हणून महिलांच्या मनातील अंधश्रद्धा निघेल का? याची शाश्वती मी तर देऊ शकत नाही. कारण महिलांच्या मनात अंधश्रद्धा पक्की घर करून बसलेली असते. कोणताही आजार झाला की, काही जणांना सवयच असते भोंदू बाबाकडे घेऊन जाण्याची. भोंदू बाबाच्या नादात माणसाचा जीव जातो आणि भोंदू बाबा चांगलाच पावतो. मित्रांनो भोंदू बाबा, देवदेवता, आसरा-मसोबा व करणी-भानामती हे सर्व थोतांड आहे. यावर विश्वास ठेवून स्वतःचे नुकसान करून घेऊ नका. ज्या बाईच्या अंगात येते, त्या बाईला भानामती किंवा करणी केली असे म्हणतात. अंधश्रद्धा ही माणसाला घर उध्वस्त करायला लावणारी जबरदस्त बाब आहे. ज्या माणसाला मानसिक आजार झालेला असतो, नेमके त्याच माणसाला करणी, भानामती व भूतबाधा झाला असे म्हणतात. ज्या बाईच्या अंगात देव येतो, त्या बाईच्या अंगात काय देव संचारत नाही, तर त्या बाईला मानसिक आजाराने ग्रासलेले असते. भोंदू बाबाकडे न जाता मनोरुग्णालयात जाऊन मानसोपचार तज्ञांचा सल्ला घेऊन मानसिक आजार म्हणजेच करणी, भानामती, भूतबाधा कायमचा कमी करता येऊ शकतो.

कोणत्याच भोंदू बाबाकडे व बुवाबापूकडे न जाता सरळ मनोरुग्णालयात जाऊन औषधोपचार चालू करावा, नक्कीच तुमच्या अंगातील करणी, भानामती, भूतबाधा व जादूटोणा कायमचा निघून जाईल. नाहक भोंदू बाबाकडे जाऊन स्वतःचे आर्थिक व शारीरिक नुकसान करून मृत्यूला जवळ करू नका. आतापर्यंत भोंदू बाबाच्या नादी लागून कित्येक जणांचे प्राण गेले आहेत. आपल्या देशात अनेक संत, महात्मे, महापुरुष, विचारवंत व थोर समाज सुधारक होऊन गेले. त्यांनी या देशातील समस्त बहुजन जनतेला अंधश्रद्धेच्या जोखडातून बाहेर काढण्यासाठी अनेक पुस्तके लिहिली, भाषणे दिली व विज्ञानवादी दृष्टिकोन जोपासायला सांगितला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी अंधश्रद्धेवर कडाडून हल्ले चढवले. संत गाडगे महाराज यांनी अंधश्रद्धेला मुठमाती देण्यासाठी समस्त बहुजन जनतेला कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धेवर हातोड्याचे घाव घातले. कीर्तनातून व वर्तनातून अंधश्रद्धेला चांगलाच दणका दिला. गाडगेबाबा म्हणायचे की, बांधवांनो देव दगडात नसून माणसात आहे. देव कोणत्या दगडात नाही, कोणत्या मंदिरात नाही ना कोणत्या देवळात नाही तर देव माणसात आहे, मानव प्राण्यात आहे. देव आई-वडिलांमध्ये आहे, देव आपल्या समस्त महापुरुषांमध्ये आहे. त्यांची पूजा करा. त्यांचे विचार आत्मसात करा आणि अंधश्रद्धेला कायमची मूठमाती देऊन विज्ञानाचा सन्मान करा. या देशात जेवढे महापुरुष व विचारवंत होऊन गेलेत त्यांनी अंधश्रद्धेला कधीच मानले नाहीत तर त्यांनी अंधश्रद्धेवर कडाडून टीका केली आहे. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी अमावस्येच्या रात्री सर्वाधिक लढाया लढल्या आणि त्या जिंकल्या सुद्धा. छत्रपती शिवरायांच्या शिवशाहीत अंधश्रद्धेला थारा नव्हता. छत्रपती शिवाजी महाराज विज्ञानवादी राजे होते. डॉ. नरेंद्र दाभोलकर यानी अंधश्रद्धेचा कायमचा नायनाट करण्यासाठी जीवनभर अंधश्रद्धेवर कुऱ्हाडीचे घाव घालत राहिले. त्यांचा अंधश्रद्धा मुक्त भारत करण्याचा विचार दुर्दैवाने पूर्ण होऊ शकला नाही. काही समाजकंटकांनी व सनातनी विचारधारेच्या लोकांनी त्यांची गोळ्या झाडून हत्या केली. दाभोलकरांनी गावोगावी व खेडोपाडी जाऊन लोकांना भाषणाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले. भोंदू बाबा व बुवाबाजीवर कडाडून टीका केली. भोंदू बाबाचे काळे कारनामे व त्यांचे खरे पितळ उघडे पाडले. पण आमचे लोक पुस्तकांचे वाचन करायला तयार नाहीत. मोबाईलच्या दुनियेत पुस्तकांचे वाचन फार कमी झाले आहे. आपल्याला अंधश्रद्धेतून बाहेर निघण्यासाठी अगोदर आपल्याला महापुरुषांचे विचार आत्मसात करून देशात त्यांच्या सुविचारांची पेरणी करावी लागेल आणि विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून अंधश्रद्धेला कायमची मूठमाती द्यावी लागेल. थोर विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, ज्या दिवशी मंदिराकडे जाणाऱ्या रांगा वाचनालयाकडे वळतील त्या दिवशी आपला देश प्रगतीचे एक दमदार पाऊल टाकेल. मित्रांनो अंधश्रद्धा ही समाजाला लागलेली फार मोठी कीड आहे. अंधश्रद्धा माणसाला पोखरून खाते. ज्या दिवशी आपल्या देशातील लोक अंधश्रद्धेला मुठमाती देऊन विज्ञानाला स्वीकारतील त्यादिवशी आपल्या देशाच्या विकासाचा आलेख उंचावल्या शिवाय राहणार नाही...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## राजवाडा

प्रत्येकाप्रियसिंहासन
हवाहवासा राजवाडा
अचानक न स्वप्नपूर्ती
अंमळधीर जराकाढा

जाणीव होते लढता
सरळ सोपा नसे लढा
चाणाक्षते व्यूह रचना
शस्त्र सज्जते या लढा

ढळेलं निश्चय निश्चित
वाळूचे पायांवर खडा
निश्चिंत बेसावध जरा
कोसळे स्वप्न धडधडा

सैन्य मनोबला महत्व
निरुपयोगी रण गाडा
जयपराजय पाठोपाठ
फिरत राहे रहाटगाडा

शत्रुसैन्य ते सिमेबाहेर
मित्रांनी घातलायं वेढा
व्यूहरचना ढिसाळ का
युध्दाचा उचलता विडा

अंतस्थ अस्वस्थ भारी
ऐनवेळी घालतीखोडा
स्वच्छ करा नातेबंधन
गैरसमज संपूर्ण खोडा


**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# साने गुरुजी !!

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला.

त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले.

सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली.



त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत.

१९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मासू येथे केंद्रस्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धा संपन्न मनसेचे प्रमोद गांधी यांचे लाभले सहकार्य



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२२, मासू (गुहागर) :** पं.स.शिक्षण विभाग गुहागर यांच्या वतीने शीर केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडास्पर्धा नुकत्याच जि.प.पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा मासू नं.१ येथे आयोजित करण्यात आल्या होत्या, सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहात सहभाग घेतला होता,वयक्तिक तसेच सांघिक गटाने ही क्रीडा स्पर्धा राबविण्यात आली.

सदर स्पर्धेला उद्योजक तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी त्याचबरोबर राजेश कणेरी, राजेश भोजने, निर्मला इलेव्हन क्रिकेट संघ तवसाळ संघ प्रमुख निलेश कुळये, मैथिली भाटकर, अनंत भुवड तसेच मासू गावातील दानशूर व्यक्तिमत्व आणि आजी माजी विद्यार्थी यांच्या विशेष सहकार्य लाभले.

क्रीडा स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ग्रामविकास मंडळ मासूचे अध्यक्ष विजय मसुरकर, मुंबई मंडळाचे अध्यक्ष अशोक मास्कर, सरचिटणीस सुधाकर मास्कर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मंगेश मास्कर, उपाध्यक्ष उज्वला नाचरे,सिमरन नाचरे, सुनील नाचरे, पांडुरंग नाचरे, महादेव नाचरे, वाडीप्रमुख,ग्रामस्थ बंधू भगिनी, शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र कुळये, वाकडे सर, उजळे सर, उकार्डे मॅडम यांनी अथक परिश्रम घेतले.

## नवक्षितिज दिनदर्शिका २०२६ चे मुंबईत प्रकाशन




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२३, मुंबई :** गावविकासात अग्रस्थानी असलेले गुहागर तालुक्यातील कुणबीवाडी विकास मंडळ,असोरे (रजि) मंडळाची नवक्षितिज दिनदर्शिका - २०२६ चा प्रकाशन सोहळा रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी पर्ल सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम)मुंबई येथे मंडळाचे माजी अध्यक्ष दिलीप बादावटे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच माजी उपाध्यक्ष वासुदेव गोंधळी,माजी सचिव दिपक वेलुंडे, सचिव अशोक गोंधळी,रमेश गोपाळ गोंधळी,कमलाकर बादावटे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा विकासाला चालना मिळावी यासाठी कार्यकारिणीच्या पुढाकारातून प्रथमच

नवक्षितिज दिनदर्शिका- २०२६ प्रकाशित करण्याचा अभिनव उपक्रम कुणबीवाडी विकास मंडळाने हाती घेतला.

पंचक्रोशीसह गावातील छोट्या-मोठ्या उद्योजकांची प्रसिद्धी करणे आणि मंडळाच्या विकासाला आर्थिक लाभ मिळवून देणे या दुहेरी उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमास मंडळातील सभासदांसह गावातील तसेच मुंबईत वास्तव्यास असलेल्या ग्रामस्थ, देणगीदार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या सहकार्याबद्दल मंडळाचे विद्यमान अध्यक्ष दिनेश डिंगणकर यांनी कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले आहेत.सदर सोहळ्याला असोरे गावातील मुंबईस्थित ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खेळ, शिस्त आणि नेतृत्व घडवणारा सार्थक इंग्लिश मीडियम स्कूलचा क्रीडा महोत्सव




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२३, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील नावलौकिक प्राप्त सार्थक इंग्लिश मीडियम स्कूल येथे सन २०२५ च्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे भव्य आणि उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कराटे, मल्लखांब व साहसी क्रीडा प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. आत्मविश्वास, शिस्त आणि कौशल्य यांचे उत्कृष्ट दर्शन घडवणाऱ्या या प्रात्यक्षिकांमुळे संपूर्ण मैदानात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

हा क्रीडा महोत्सव २२ ते २७ डिसेंबर दरम्यान पार पडत असून, यामध्ये धावणे, रिले रेस, लांबउडी, थ्री लेग्स, कबड्डी, क्रिकेट, लिंबू-चमचा, बुद्धिबळ, कॅरम अशा विविध मैदानी व मैत्रीपूर्ण खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला आहे.

शाळेचे मुख्याध्यापक संतोष निचिते यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत क्रीडांचे महत्त्व विशद केले. क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्त व आत्मविश्वास वृद्धिंगत होतो, असे त्यांनी सांगितले. तसेच दररोज विविध स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी डीएसओ अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये कराटे, बुद्धिबळ व मल्लखांबमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

हा क्रीडा महोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक संतोष निचिते, उपमुख्याध्यापक अरविंद निपुर्ते, क्रीडा शिक्षक संतोष विशे, वर्षा वालकोली तसेच सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

या क्रीडा महोत्सवाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, सार्थक इंग्लिश मीडियम स्कूल हे केवळ शिक्षण देणारे नव्हे तर शिस्त, नेतृत्व, क्रीडावृत्ती व संस्कार घडवणारे आदर्श शैक्षणिक केंद्र असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.


# दिव्यात कुत्रा चावल्याने ५ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू !

## आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न – दिव्यातील नागरिक

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील बेडेकर नगर, दिवा–आगासन रोड परिसरात कुत्रा चावल्याच्या घटनेनंतर उपचार सुरू असतानाच ५ वर्षीय निशा शिंदे या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर असून यामुळे महापालिका प्रशासन व सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना दिव्यातील नागरिकांनी सांगितले की,

या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी होणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून वस्तुस्थिती समोर येईल.१७ नोव्हेंबर रोजी घराबाहेर खेळत असताना एका पिसाळलेल्या कुत्र्याने चिमुकलीवर हल्ला केला होता. त्यानंतर तिला तातडीने डोंबिवली येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू करून आवश्यक इंजेक्शन्स दिल्याची माहिती देण्यात आली. पुढील काही आठवडे तिच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. ३ डिसेंबर रोजी तिचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी तिची प्रकृती स्थिर असल्याचे कुटुंबीयांना सांगण्यात आले होते. मात्र १६ डिसेंबर रोजी चौथे इंजेक्शन दिल्यानंतर अचानक तिची प्रकृती बिघडली आणि रेबिजची लक्षणे दिसू लागल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. परिस्थिती गंभीर झाल्यानंतर तिला मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात हलवण्यात आले.



मात्र तेथे पोहोचल्यानंतर तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. उपचार सुरू असताना दीर्घ कालावधीनंतर रेबिजची लक्षणे दिसणे हे गंभीर स्वरूपाचे असून उपचार पद्धती, औषधांचा दर्जा, वैद्यकीय निरीक्षण व संदर्भ प्रक्रियेबाबत वस्तुनिष्ठ तपास होणे आवश्यक आहे, असे दिव्यातील नागरिकांनी नमूद केले.या प्रकरणात कोणतीही वैद्यकीय अथवा प्रशासकीय त्रुटी झाली आहे का, याची सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियम ानुसार कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षा दिव्यातील नागरिकांनी व्यक्त केली.

तसेच दिवा शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न दीर्घकाळापासून प्रलंबित असून सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने याबाबत प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.या घटनेमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य उपाययोजना केल्या जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# लोकमंगल साखर कारखाना भंडारकवठे २७०० रुपयांवर ठाम !



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२३, सोलापूर :** ऊस दराच्या मागणीसाठी भंडारकवठे येथील लोकमंगल कारखान्याच्या गव्हाणीत बसून आंदोलन करणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांना व्यवस्थापनाने रात्री गव्हाणीतून बाहेर काढत गेटच्या बाहेर पाठवले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे आणि सचिव मोहसीन पटेल यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी दुपारी १२ वाजता लोकमंगलच्या गव्हाणीत ठिय्या मारला आणि आंदोलन सुरु केले होते. यंदाच्या गळीत हंगामासाठी पुरवठा केलेल्या ऊसाला ३४०० रूपये दर मिळावा, गाळपाला ऊस आल्यानंतर १५ दिवसांच्या आत बिलाची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावी, संघटनेच्या या दोन प्रम ुख मागण्या होत्या. गुरुवारी सायं. ६ वाजता कारखान्याचे प्रमुख सतीश देशमुख आणि शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये चर्चा सुरू झाली. चर्चेत संघटनेने किमान ३००० रुपये दरावर सहमती दर्शवली, मात्र सतीश देशमुख २७०० रु. दरावर ठाम राहिले. त्यामुळे तडजोड होऊ शकली नाही. शेवटी कारखान्याने संघटनेला आंदोलन बेकायदेशीर असल्याचे ६ पानी पत्र दिले.त्यानंतर मंद्रूप पोलिस ठाण्याच्या पोलिसांना पाचारण करण्यात आले.

▶आम्ही शांततेच्या मार्गान आंदोलन करीत होतो. मात्र आंदोलन मोडून काढण्यासाठी कारखान्याने पोलीस बळाचा वापर केला. शेतकऱ्यांना न्याय देण्याऐवजी अन्याय केला. लोकमंगल कारखान्याकडून शेतकऱ्यांना अत्यंत वाईट वागणूक देण्यात आली.

**- विजय रणदिवे,**
**जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शे.सं. सोलापूर**

▶कारखान्याने शेतकरी आंदोलनाची माहिती दिली. तेथे शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची आमची जबाबदारी असल्याने कारखान्यावर पोलिस गेले. त्यांनी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची आणि शेतकऱ्यांची समजूतकाढली. पोलीस बळाचा वापर केला नाही.

**- मनोज पवार,**
**स. पो.नि. मंद्रूप पोलीस ठाणे.**

पोलिसांनी शेतकऱ्यांना विनंती करून गव्हाणीच्या बाहेर काढले. कारखाना व्यवस्थापनाच्या सूचनेनुसार त्यांना गेटच्या बाहेर पाठवण्य आलें. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करीत लोक मंगल कारखान्याच्या व्यवस्थापनाचा निषेध व्यक्त केला.

कडाक्याची थंडी असल्यामुळे गेटच्या बाहेर आल्यानंतर आंदोलन स्थगित केल्याची घोषणा करण्यात आली. यावेळी आंदोलनात संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, मोहसीन पटेल, इकबाल मुजावर, बापूराव पाटील, वसंत पाटील, बिळ्याणी सुंटे, बाहुबली सावळे यांच्यासह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

**बोलणी फिसकटली...**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सुरुवातीच्या काळात आक्रमक भूमिका घेतली. नंतर मात्र ३००० रुपयेपर्यंत स्वीकारण्याची तयारी दर्शवली. मागील वर्षी २८०० रुपये दिले, यावेळी किमान २९०० रुपये तरी द्या अशी विनंती केली. कारखान्याची एफआरपी २४६१.९९ रुपये असून आम्ही २७०० रुपये देतो. त्यापेक्षा अधिक परवडत नाही.आम्हाला कारखाना बंद ठेवणे परवडेल, असे बजावल्याने संघटना आणि कारखाना यांच्यातील बोलणी फिसकटली.

# इंदोर मनपा अभ्यास गटाची नवी मुंबई शहराला भेट

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत काही वर्षांपासून देशात सातत्याने पहिल्या ३ क्रमांकामध्ये अग्रभागी असणाऱ्या ४ शहरांची 'सुपर स्वच्छ लीग' ही एक विशेष कॅटेगरी निर्माण करण्यात आलेली असून त्यामध्ये नवी मुंबईसह मानांकित असणाऱ्या 'इंदोर महानगर पालिकेतील अभ्यासगटाने नुकतीच नवी मुंबई महानगर पालिकेस भेट देऊन विविध प्रकल्पांची पाहणी केली व नवी मुंबईत आधुनिक तंत्रप्रणालीचा अंगिकार करून केल्या जात असलेल्या नाविन्यपूर्ण कामांची प्रशंसा केली.

या दोन दिवसीय अभ्यास दौऱ्यात त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय वास्तूच्या रचनेचे व तेथील अत्याधुनिक सुविधांचे आणि प्राधान्याने येथील स्वच्छतेचे कौतुक केले. दैनंदिन कचरा संकलन आणि वाहतुक प्रणालीचे नियमित निरीक्षण आणि त्यावर नियंत्रण करणाऱ्या मुख्यालयात पहिल्या मजल्यावर स्थापित इंटिग्रेटेड कमांड आणि कंट्रोल सेंटरला भेट देऊन त्यांनी संपूर्ण प्रणाली जाणून घेतली. कोणते वाहन कुठे आहे, त्याने कोणत्या वेळी कुठल्या कचरापेटीतील कचरा संकलित केला यावर कचऱ्याच्या




डब्यावरील मायक्रोचीपद्वारे तसेच वाहनावरील जीपीएस प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवले जात असल्याची कार्यप्रणाली उत्तम असल्याचे अभिप्राय त्यांनी दिले.

केंद्रीय वस्त्र मंत्रालय संचलित वस्त्र समिती आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या वस्त्र कचरा पुनर्प्रक्रिया केंद्राची पाहणी करताना ते प्रभावित झाले. वस्त्र कचरा संकलित करून तो आकर्षक साहित्याच्या रूपाने पुनर्वापरात आणणाऱ्या प्रकल्पाच्या वेगळेपणाचे त्यांनी कौतुक केले.

नेरूळ येथील वंडर्स पार्कमध्ये असलेल्या जगातील आठ आश्चर्यांच्या प्रतिकृतींमधून माहिती मिळते व म नोरंजनाच्या साधनांमधून संपूर्ण कुटुंबासाठी एकत्र वेळ घालविण्याचे एक उत्तम माध्यम उपलब्ध होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यानजिक निर्माण होणाऱ्या सायन्स पार्कची त्यांनी माहिती जाणून घेतली व तो पूर्ण झाल्यानंतर भेट देण्यास आवडेल असे सांगितले.

नेरूळ येथील रूग्णालयात सुरू असलेल्या कॅन्सर रजिस्ट्री आणि डायलेसिस केंद्राला भेट देऊन सध्याच्या परिस्थितीत कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन महानगरपालिकेने पुढाकार घेत हा अत्यंत महत्वाचा आरोग्य उपक्रम सुरू केल्याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले.

कोपरखैरणे येथील जुनी क्षेपणभूमी बंद करून त्याठिकाणी फुलविलेले निसर्गोद्यान व तेथील मियावाकी शहरी जंगल प्रकल्प अतिशय उल्लेखनीय असल्याचे अभिप्राय त्यांनी दिले. त्याबाजूलाच असलेल्या सी-टेक मलप्रक्रिया केंद्रातून केलेल्या सांडपाण्यावर अधिकची टर्शिअरी ट्रिटमेंट करून ते पुनर्प्रक्रियाकृत पाणी केल्ल उद्योगसमुह, बांधकामे, उद्याने यासाठी वापरण्यात येत असल्याची व त्यातूनही महानगर पालिकेस उत्पन्न प्राप्त होत असल्याची त्यांनी विशेष नोंद घेतली व या अभिनव उपक्रमाची प्रशंसा केली. ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारक पाहून हे देशातील सर्वोत्तम स्म ारकांपैकी एक असल्याचे अभिप्राय त्यांनी नोंदविले.

नवी मुंबई हे नावाप्रमाणेच नाविन्याचा स्विकार करणारे शहर असून शहरातील स्वच्छता, त्यासाठी केले जात असलेले प्रयत्न, त्यामध्ये आधुनिक तंत्रप्रणालीचा केला जात असलेला उपयोग तसेच उल्लेखनीय अशा अभिनव प्रकल्पांच्या माध्यमांतून शहरातील नागरिकांना व बाहेरील पर्यटकांना दिल्या जात असलेल्या सुखसुविधा याचे इंदोर महानगरपालिकेतील अभ्यासगटाने कौतुक केले. नवी मुंबईच्या आतिथ्यशीलतेनेही भारावून गेल्याचे सांगत इंदोर शहराला नक्की भेट द्यावी असे आमंत्रणही त्यांनी दिले.

# टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतकडून ५० टक्के कर सवलत

## लाभ घेण्याचे सरपंच अरुणा खिलारी यांचे आवाहन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५ अंतर्गत ग्रामपंचायत टाकळी ढोकेश्वर यांच्या वतीने ०१ एप्रिल २०२५ पूर्वीची निवासी मालमत्ता कर थकबाकी व चालू बाकी ३१ डिसेंबर २०२५ अखेर एकरकमी भरल्यास थकबाकी वर ५० टक्के सवलत मिळणार असल्याची माहिती सरपंच अरुणा खिलारी व ग्राम सेवक बाळासाहेब दावभट यांनी दिली.



यासंदर्भात अधिक माहिती देताना सरपंच खिलारी पुढे म्हणाल्या की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५ अंतर्गत ग्रामपंचायतींना उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहन दिले जाते. ज्यामध्ये करसवलत हा एक महत्त्वाचा भाग आहे. विशेषतः ग्रामपंचायतींना थकबाकी कर वसुलीसाठी प्रोत्साहन म्हणून निवासी मालमत्ता करावर ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरून ग्रामपंचायती अधिक कार्यक्षम होतील आणि गावे समृद्ध होतील. हे अभियान ऑगस्ट २०२५ मध्ये सुरू झाले असून, यात ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना योजनांच्या अंमलबजावणीसाठी स्पर्धात्मक वातावरण देणे आणि शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे हे उद्दिष्ट आहे.

हे अभियान केवळ कर सवलतीपुरते मर्यादित नसून, ते ग्रामपंचायतींना अधिक जबाबदार आणि कार्यक्षम बनवून गावांच्या शाश्वत विकासासाठी एक व्यापक प्रयत्न आहे. ज्यामध्ये कर सवलतीसारखे प्रोत्साहनपर घटक समाविष्ट आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयानुसार, टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील निवासी मालमत्ता कर थकबाकीदार ग्रामस्थांना ही एक मोठी संधी आहे. या महिन्यातील शेवटचे ७ दिवस राहिलेले आहेत. यामुळे थकबाकी ग्रामस्थांनी थकबाकी भरून ५० टक्क्यांपर्यंत सुवर्ण सवलतीचा लाभ घ्यावा या योजनेच्या अधिक माहितीसाठी ग्रामपंचायत कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कबड्डी संघासोबत न गेलेल्या प्रशिक्षकांवर निलंबनाची कुऱ्हाड

## सोलापूर विद्यापीठाकडून प्रा.भक्तराज जाधव दोन वर्षांसाठी निष्कासित

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२३, सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण कडक कारवाई केली आहे. त्यांना पुढील दोन वर्षांसाठी निवड समिती सदस्य, संघ प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापक या पदांवरून निष्कासित करण्यात आले आहे. विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी या निर्णयाची माहिती दिली. दरम्यान, १८ डिसेंबर २०२५ च्या पत्राद्वारे महाविद्यालयाच्या प्राचार्यांना याबाबत कळवण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।

नेमकी घटना काय ? १ ते ५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान इंदोर (मध्य प्रदेश) येथे झालेल्या पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या पुरुष संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा. जाधव यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, ते प्रत्यक्ष संघासोबत केला.

अधिसभेत (सिनेट) सदस्य अजितकुमार संगवे आणि गणेश डोंगरे यांनी उपस्थित सुरुवातीला डॉ.लकडे यांनी 'प्रशिक्षक संघासोबत गेले आहेत' असे उत्तर दिले होते. मात्र, डोंगरे यांनी सभागृहातच भ्रमणध्वनीवरून प्रा. जाधव यांच्याशी संपर्क साधून कुलगुरू प्रा.प्रकाश महानवर यांच्याशी त्यांचे बोलणे करून दिले. त्यावेळी प्रा. जाधव यांनी, 'मी गेलो नसून माझ्याऐवजी एका वरिष्ठ खेळाडूला पाठवले आहे,' अशी कबुली संचालक प्रा. भक्तराज जाधव यांच्यावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गेले नव्हते.

हा गंभीर मुद्दा विद्यापीठाच्या सोलापूर विद्यापीठ दिली. विद्यापीठाच्या परवानगीशिवाय अशा प्रकारे परस्पर दुसऱ्या व्यक्तीला पाठवता येते का? असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर कुलगुरूंनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमली होती.

**चौकशी समितीचा निर्णय – डॉ.केदारनाथ**

काळवणे, नंदकिशोर देशपांडे आणि अशोक पाटील यांच्या समितीने या प्रकरणाची सखोल चौकशी केली. समितीच्या अहवालानुसार, कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत प्रा. जाधव यांना २ वर्षांसाठी क्रीडा विभागाच्या सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांतून निष्कासित करण्यात आले आहे.

**विद्यापीठ पर्यायी व्यवस्था करेल**

'अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी, यापुढे नियुक्त केलेले निवड समिती सदस्य, प्रशिक्षक किंवा व्यवस्थापक उपस्थित राहू शकणार नसतील, तर त्यांनी विद्यापीठाला आगाऊ कळवणे अनिवार्य आहे. जेणेकरून विद्यापीठ वेळेत पर्यायी व्यवस्था करू शकेल.'

**– डॉ.अतुल लकडे,**
**क्रीडा संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ.**

# समस्या ठाण्यात ठाण मांडून; निवडणूक प्रचार विकास मांडून...

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२३, ठाणे :** निवडणूक काळात उमेदवार आणि पक्षांकडून विकासाची मोठी आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्षात नागरिकांच्या मूलभूत समस्या आजही ठाण मांडून उभ्या असल्याचे चित्र दिसत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, प्रवास, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण अशा प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष कायम असतानाच प्रचारसभांमध्ये मात्र विकासाच्या गगनभेदी घोषणा केल्या जातात.




स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रत्येक निवडणुकीत विकासाच्या नावाखाली मतांची मागणी केली जाते; मात्र निवडणूक संपताच आश्वासनांची पूर्तता होत नाही. परिणामी समस्या जैसे थेच राहतात.

खड्डेमय रस्ते, अनियमित पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापनाचा अभाव, वाहतूक कोंडी, प्रवास, पार्किंग, अतिक्रमण, धोकादायक इमारती, पुर्नविकास आणि अपुऱ्या आरोग्य सुविधा अश्या कितीतरी मुलभूत आणि पायाभूत समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. दरम्यान, राजकीय नेते प्रचारात मोठे प्रकल्प, निधी आणि भविष्यातील आराखडे मांडत असले, तरी जमिनीवरील वास्तव वेगळेच आहे.

त्यामुळे समस्या ठाण्यात ठाण मांडून, आणि प्रचारात विकास मांडून अश्या परिस्थितीला छेद जाणे गरजेचे असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. ठाणे पालिकेत नागरिक आता घोषणांपेक्षा प्रत्यक्ष काम करणाऱ्या नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

# बाल वैज्ञानिक स्पर्धेत के.रामलू शाळेचे दोन विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२३, कुंडलवाडी (नांदेड) :** मुंबई सायन्स टिसर्च असोसिएशनच्यावतीने राज्यस्तरावर डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा आयोजित केली जाते. या परीक्षेच्या दुसऱ्या फेरीसाठी येथील के.रामलू पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. शाळेच्या ४० पैकी १६ विध्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी दोन विद्यार्थ्यांनी दुसऱ्या फेरीसाठी प्राप्त ठरले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता सहावीचा विद्यार्थी आरुष मनोज वळसंगीकर व नववीचा विद्यार्थी प्रसाद चक्रधर दीडशेरे यांचा समावेश आहे. डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेला विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची रुची वाढविण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोण प्रगल्भ करण्यासाठी महत्त्व दिले जाते. ही परीक्षा चार स्तरावर आयोजित करण्यात येते. विशेष म्हणजे परीक्षेतील पहिल्या फेरीमध्ये के.रामलू पब्लिक स्कूल चे १६ विद्यार्थी पास झाले, पण त्यापैकी दोन विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. अभ्यासासाठी करण्यात येणाऱ्या विशेष प्रयत्नांमुळे हे यश संपादित करता आल्याचे मनोगत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार व सचिव यशवंत संगमवार तसेच संचालिका रमा ठक्कुरवार प्रिंसिपल जे.संभाजी, व्हाय प्रिंसिपल एम.सपना यांनी मार्गदर्शक शिक्षक व शिक्षिकेचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# राजेंद्र विद्यालयात राष्ट्रीय गणित दिन साजरा

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२२, खंडाळा (सातारा) :** खंडाळा येथील राजेंद्र विद्यालयात २२ डिसेंबर राष्ट्रीय गणित दिवस विविध नावीन्यपूर्ण उपक्रमातून उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून केंद्रप्रमुख संगीता कदम, संचालक वसंतराव पंडित, प्राचार्य तुळशीराम खांडे, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, सुशिला मोहिते, पवार, भांडवलकर, राक्षे, माने, ग्रंथपाल हणमंत यादव, प्रा.अमीर इनामदार आदींनी राजेंद्र विद्यालयाच्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी तयार केलेली गणितीय उपकरणे आणि पोस्टर्सना भेट देऊन कौतुक केले. भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी चेन्नई येथे महान गणितज्ञ श्रीनिवास अय्यंगार रामानुजन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात श्रीनिवास रामानुजन यांना श्रद्धांजली वाहिली. २२ डिसेंबर हा राष्ट्रीय गणित दिवस म्हणून घोषित करण्यात आला, अशी महत्वपूर्ण माहिती प्राचार्य तुळशीराम खांडे यांनी दिली.

# मिरा भाईंदर महानगरपालिका निवडणूकीसाठी सज्ज

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२३, मिरा भाईंदर :** आजच्या पत्रकार परिषदेत चइचउ आयुक्तांनी मिरा भाईंदर नगरपालिका निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे जाहीर केले. ५ हजार पेक्षा जास्त कर्मचारी निवडणूक निपक्षपणे पार पाडण्यासाठी तयार केले आहेत, त्यासाठी पालघर व ठाणे पालिका कर्मचाऱ्यांना बोलावले आहे. ९५८ पोलिंग स्टेशन निवडणूक साठी तयार केले आहेत. निवडणुकीच्या कार्यक्रमामध्ये नामनिर्देशन स्वीकारण्याचा कालावधी २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर, छाननी ३१ डिसेंबर, अर्ज माघारीची अंतिम तारीख २ जानेवारी, आणि चिन्ह वाटप व उमेदवारांची अंतिम यादी ३ जानेवारी २०२६ असेल. पत्रकारांनी निवडणूक याद्या सदोष असल्याचे काँग्रेसचे नेते मुझ्झफर हुसैन व परिवहन मंत्री प्रताप सरनाईकने लेखी आरोप केले आहेत, त्यासंबंधी पालिकाने काय कारवाई केली त्या प्रश्नावर आयुक्ताने उत्तर देणे टाळले. आयुक्तांनी पत्रकारांना आवाहन केले की, निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त मतदान टक्के वाढेल त्यावर पत्रकारांनी प्रचार प्रसार करावा. निवडणुकीची अधिक माहिती पालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

# वार्ड क्रमांक ३मधून दोन्ही उमेदवारांचा दणदणीत विजय

**अक्षराज : स्वप्नील देशमुख**

**दि.२३, कर्जत (रायगड) :** गेल्या काही दिवसापासून निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्जत नगरपालिकेचा निकाल दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी लागला. परिवर्तन विकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पुष्पा दगडे प्रचंड मताने विजय झाल्या. त्यांनी महायुतीच्या स्वाती अक्षय लाड यांनी ४ हजार ७०० अधिकची मते मिळून त्यांचा पराभव केला. तसेच वार्ड क्रमांक तीन मध्ये अंजली अतुल कडू यांनी महायुतीच्या स्वामिनी मांजरे यांचा पराभव केला. तसेच सर्वसाधारण पुरुष मध्ये महायुतीचे ज्ञानेश्वर कर्नूक तसेच ठाकरे गटाचे दोन वेळा कर्जत नगरपालिकेवर नगरसेवक म्हणून काम करणारे संतोष पाटील हे उभे होते. पहिल्यांदा सहज वाटणारी निवडणूक तिसऱ्या फेरी अखेर पर्यंत चालली. व त्यामध्ये ठाकरे गटाचे संतोष पाटील यांनी १३० अधिकची मते घेऊन विजय संपन्न केला त्यांची सीट लागल्यावर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला तसेच संपूर्ण वार्ड मध्ये मिरवणूक काढली.

# थोडक्यात

## भारतीय कृषी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** गोपाल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत भारतीय कृषी विद्यालय, भारतीय आदर्श प्राथमिक शाळा व गोकुल कॉन्व्हेंट यांच्या संयुक्त विद्यमानाने तीन दिवसीय स्नेहसंमेलन विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत भारतीय कृषी विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटन पश्चिम नागपूर विधानसभाचे आमदार विकास ठाकरे, आमदार अभिजीत वंजारी व स्नेहसंमेलनाध्यक्ष बाळासाहेब पन्नासे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव राकेश पन्नासे, कोषाध्यक्ष प्रज्ञाताई पन्नासे, नागपूर मनपा स्थायी समितीचे माजी सभापती संदीप जाधव, माजी नगरसेविका संगीताताई गिऱ्हे, शारदाताई रोशनखेडे, अमर खोडे, संस्थेच्या उपाध्यक्षा अनुसयाबाई पन्नासे, संस्थेचे सहसचिव अखिलेश पन्नासे, आनंद सिंग व संपूर्ण संचालक मंडळ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीत व सरस्वती स्तवनने करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्धाटक आमदार विकास ठाकरे व मुख्य अतिथी अभिजीत दादा वंजारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बाळासाहेब पन्नासे यांनी आजच्या शिक्षण व्यवस्थेवर आपल्या भाषणातून मनोगत व्यक्त केले. नर्सरीच्या चिमुकल्यांनी व वर्ग एक ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी बहारदार कार्यक्रम सादर केले. यामध्ये वर्ग ११ वि आर्ट च्या मुलांनी शिक्षणाचे खाजगीकरण ही नाटिका सादर केली. तसेच मोबाईलचा दुरुपयोग व हिंदी गीतावर आधारित नृत्य सादर केले. या स्नेहसंमेलनाचे अहवाल वाचन शाळेच्या पर्यवेक्षिका दीपिका तुपकर व प्रास्ताविक शाळेच्या प्राचर्या अर्चना पन्नासे, संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन मनोज महल्ले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना पन्नाशी यांच्या नेतृत्वात सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षक इतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. व शेवटी कार्यक्रमाचे आभार विनोद पवार यांनी केले.



## धामटणे जि.प.शाळेत केंद्रस्तरीय विद्यार्थ्यांच्या विविध गुण स्पर्धांचा उत्साहात समारोप

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२३, डहाणू (पालघर) :** जिल्हा परिषद केंद्रस्तरीय कोल्हाण अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या १६ शाळांमधील विद्यार्थ्यांच्या विविध गुण स्पर्धा मोठ्या आनंदात व उत्साहात सोमवारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, धामटणे येथे पार पडल्या. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.या केंद्रस्तरीय स्पर्धांमध्ये सामूहिक गायन, वक्तृत्व, एकेरी वादविवाद तसेच दुहेरी वादविवाद अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. सामूहिक गायन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पोवाडे, देशभक्तीपर गीते तसेच प्रबोधनात्मक गीतांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांमध्ये पर्यावरण, सध्याच्या काळातील विविध सामाजिक समस्या, लोकशाही व राजकारण यासारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण मते मांडत प्रभावी भाषणे सादर केली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख नंदकुमार लिलका होते. प्रस्तावना व मार्गदर्शन करताना त्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात असल्याचे सांगितले. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये अनेक कलागुण दडलेले असून शालेय, केंद्रस्तरीय, बिटस्तरीय व तालुकास्तरीय विविध स्पर्धांच्या माध्यमातून त्यांना प्रोत्साहन देण्यात येत असल्याचे ही त्यांनी नमूद केले. स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास केंद्रप्रमुख नंदकुमार लिलका, तवा ग्रामपंचायतीचे सरपंच लहू बालशी, माजी जिल्हा परिषद सदस्या लतिका बालशी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## आदर्श सरपंच पुरस्काराने गणेश गायकर यांना सन्मानित

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२३, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील वाकरूळ ग्रामपंचायतचे सरपंच गणेश गायकर यांनी ग्रामविकासात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पुणे येथील पत्रकार भवन या सभागृहात मध्ये नालंदा ऑर्गनायझेशन पुणे या संस्थेच्या वतीने त्यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील तळागाळातील जनतेची सेवा करणारे सरपंच यांना यावर्षीचा ग्राम समृद्धी सोहळा २०२५ महराष्ट्रातील प्रामाणिकपणे काम करणारे सरपंचांना सन्मानित करण्यात आले आहेत. पेण तालुक्याच्या पूर्व विभागातील वाकरूळ ग्रामपंचायतीचे उच्चशिक्षित सरपंच गणेश गायकर यांना आदर्श सरपंच पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.



पुणे येथे पार पडलेल्या सोहळ्यात नालंदा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य संघटनेचे पदाधिकारी यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, पारदर्शक कारभार, महिला सक्षमीकरण, स्वच्छता अभियान, ग्राम पंचायत हद्दीत वृक्षारोपण, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीरे,कोरोना काळामध्ये केलेली उत्कृष्ट कामगिरी, लोकवर्गणीतून केलेली विविध कामे, आमदार निधीतून केलेली विकासकामे गावचे आदर्श नेतृत्व या गुणांची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला आहे. यावेळी गावासाठी हा सन्मान अभिमानाचा क्षण असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.तसेच त्याचे विविध क्षेत्रातुन त्याचे अभिनंदनचे वर्षा होत आहेत. यावेळी बोलताना सांगितले की, ग्रामस्थांनी व आपल्या कार्यकाळातील लाभलेले ग्रामसेवक यांनी केलेले सहकार्य यामुळेच हा पुरस्कार मला प्रधान करण्यात आला. हा माझा सन्मान नसून संपूर्ण वाकरूळ ग्रामपंचायतीचा आहे अशा भावना सरपंच गणेश गायकर यांनी व्यक्त केल्या.